MHYA170001292024

**कौ.हि.म.सं.अ.अ.क्र.०४/२०२४ मधील कलम २३ निशाणी क्र.५ खालील अर्जावरील आदेश (आरती वि. संतोष व इतर)**

सदरचा अर्ज कौटुंबिक हिंसाचारापासून महिलांचे सरंक्षण अधिनियम २००५ चे कलम २३ नुसार दाखल करण्यात आलेला आहे. अर्जदाराचे असे म्हणणे आहे की, गैरअर्जदार क्र.१ तिचा पती, गैरअर्जदार क्र. २ ही सासु, गैरअर्जदार क्र. ३ व ४ हे मामसासरे, गैरअर्जदार क्र. ५ ही मामेसासु व गैरअर्जदार क्र.६ ही गैरअर्जदार क्र.३ यांची विवाहीत मुलगी आहे. लग्नानंतर अर्जदार ही सर्व दागदागिने, आंदणभांडे घेवुन व सुखी संसाराचे स्वप्न घेवुन गैरअर्जदार क्र. १ कडे त्यांची पत्नी म्हणुन सावंगी मेघे, ता.वर्धा येथे नांदण्यासाठी गेली होती. अर्जदार व गैरअर्जदार क्र.१ यांचा विवाह थाटामाटात झाल्यानंतर सुरुवातीचे ४—५ महिने चांगली वागणूक मिळाली. त्यानंतर गैरअर्जदार क्र. १ याचे दारूचे व्यसन असल्याचे समोर आले. तो दारू पिऊन येऊन अर्जदारास विनाकारण शिवीगाळ व मारहाण करीत असे तसेच तिच्या माहेराकडून वारंवार पैशांची मागणी करीत असे. अर्जदाराच्या वडिलांनी वेळोवेळी एकूण रुपये १५,००० तसेच व्यवसायासाठी रुपये २०,००० रुपये दिले, परंतु ते परत करण्यात आले नाहीत. गैरअर्जदार क्र. २ हिने अर्जदारास शारीरिक व मानसिक त्रास दिला, तिला पतीसोबत राहू दिले नाही, घरकामावरून टोमणे मारले व मारहाण केली. तिला जबरदस्तीने कापूस वेचण्याच्या कामावर पाठवून मजुरीची रक्कम स्वतः घेतली. इतर गैरअर्जदारांनीही खोटेनाटे सांगून पतीला भडकावले. घरात अवैध दारूच्या पेट्या ठेवण्यात येत असल्याने अर्जदारास भीती वाटत होती. याविषयी विरोध केल्यास तिच्यावर मारहाण होत असे. या सततच्या छळामुळे अर्जदाराने पोलीस स्टेशन कळंब येथे तक्रार दिली. भरोसा सेलमध्ये तडजोड होऊन गैरअर्जदार क्र. १ ने चांगले वागण्याची हमी दिली. मात्र काही दिवसांनी पुन्हा मारहाण व शिवीगाळ सुरू झाली. अर्जदाराच्या चारित्र्यावर खोटे आरोप करून तिच्याशी भांडण करण्यात आले व २१/१२/२०२३ रोजी तिला घराबाहेर काढण्यात आले. त्यामुळे अर्जदार माहेरी राहात असून तिचे दागदागिने व इतर वस्तू सासरीच आहेत. गैरअर्जदार अर्जदारास नांदविण्यास नकार देत असून तिचा मानसिक व शारीरिक छळ केलेला आहे. त्यामुळे मूळ तक्रार अर्जाचा निकाल लागण्यास बराच कालावधी लागण्याची शक्यता असल्याने, तोपर्यंत जीवनावश्यक गरजा भागविण्यासाठी अर्जदार हिला तातडीने अंतरिम खावटीची नितांत आवश्यकता आहे.

२.  गैरअर्जदार क्र.1 हा सेंट्रींगचा व्यवसाय करत असुन त्यापासुन दरमहा रुपये २५ ते ३० हजार उत्पन्न मिळते. तसेच वडीलांची तीन एकर शेतजमिन वहिती करुन त्यापासुन ३ लाख वार्षिक उत्पन्न मिळते. याउलट, अर्जदार हिच्याकडे उत्पन्नाचे कोणतेही साधन नाही. त्यामुळे तिने प्रतिमाह रुपये १०,०००/– च्या अंतरिम पोटगीची मागणी केली आहे.

३.  प्रकरणात गैरअर्जदार हजर झाले. त्यांनी त्यांचा लेखी जबाब नि.क्र.२० प्रमाणे दाखल केला. त्यात त्यांनी अर्जदाराने लावलेले कौटुंबिक हिंसाचाराचे सर्व आरोप फेटाळले आहेत. त्यांनी अर्जदाराचा कुठलाही कौटुंबिक छळ केलेला नाही. त्यांनी पुढे असे म्हणणे मांडले की, ते गरीब शेतकरी आहे. अर्जदार ही कष्टाळु मुलगी आहे अशी माहीती लग्नाचे वेळेला गैरअर्जदारांना देण्यात आली होती. त्यामुळेच दोघांचे लग्न झाले. परंतु नांदायला आलयानंतर अर्जदाराने मला येथे करमत नाही, माझे लग्न जबरदस्तीने करुन देण्यात आलेले आहे, मला चांगला नोकरीवाला मुलगा मिळाला असता असे टोमणे मारणे सुरु केले. गैरअर्जदाराने अर्जदाराची सर्व काळजी घेतली व मागण्या पुर्ण केल्या. परंतु ती उठसुठ माहेरी जायची. अर्जदार घरातील कोणतेही कामे करत नव्हती. त्यामुळे गैरअर्जदाराची म्हातारी आई भांडे धुणे, कपडे धुणे अशी दैनंदिन कामे करायची. गैरअर्जदाराला अर्जदाराच्या बॅगमध्ये एक चिठठी सापडली. ती चिठठी म्हणजेच कळंब येथील एका मुलाने अर्जदाराला दिलेले प्रेमपत्र होते. अर्जदाराने ती बाब बघितल्यावर गैरअर्जदाराच्या हातुन ती चिठठी हिसकली व जाळुन टाकली. त्यानंतर अर्जदाराचे नातेवाईक दुसरे दिवशी घरी आले. गैरअर्जदार घरी नसतांना त्यांनी गैरअर्जदाराचे आईला मारहाण केली व सर्व कपडेलत्ते घेवुन निघुन गेली. त्यानंतर सुध्दा गैरअर्जदाराने अर्जदारास नांदवण्यासाठी बरेच प्रयत्न केले. परंतु अर्जदाराच्या घरच्यांनी गैरअर्जदाराकडे पाच लाख रुपयाची मागणी केली व सोडचिठठी देण्यास सांगितले. अर्जदार स्वतःहुन गैरअर्जदाराचे घर सोडुन गेलेली आहे. त्यामुळे तिला खावटी मागण्याचा कोणताही अधिकार नाही. सबब, अर्ज नामंजूर करावा अशी विनंती गैरअर्जदाराने केली आहे.

४.  अर्जदाराचे विद्वान वकील श्री तौसिफ अली व गैरअर्जदारांचे विद्वान वकील श्री. व्ही.व्ही.मोहनापुरे यांचा युक्तिवाद ऐकला. प्रकरणातील प्रथमदर्शनी पुराव्याचे अवलोकन करण्याआधी सदर कायद्याच्या कलम २३ मधील कायदीय बाबींचे अवलोकन करणे आवश्यक आहे. सदर कायद्याच्या कलम २३ मध्ये असे नमुद करण्यात आले आहे की, न्यायालयास न्याय व योग्य वाटत असेल व सकृतदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला आहे अथवा नाही किंवा

तशी होण्याची शक्यता असेल तर न्यायालय अंतरिम आदेश पारित करु शकतात. या ठिकाणी हे सुध्दा नमुद करणे आवश्यक आहे की, कोणत्याही अंतरिम मागणीचा विचार करताना संपरिक्षेमध्ये अपेक्षित असणाऱ्या भक्कम पुराव्याची आवश्यकता नाही. अंतरिम मागणीचा अर्ज निकाली काढताना सकृतदर्शनी पुरावा बघणे आवश्यक आहे. या व्यतिरिक्त अर्ज निकाली काढताना सदर कायद्याच्या हेतु व उद्देशांकडे सुध्दा डोळस दृष्टीने बघणे आवश्यक आहे. सदर कायदा हा महिलांविरुध्द होणाऱ्या हिंसाचारास प्रतिबंध करण्याकरिता तसेच महिलांचे सक्षमीकरण करण्या करिता पारित करण्यात आला आहे. सदर कायद्यामध्ये पुरुषांच्या नैसर्गिक तसेच मुलभुत कर्तव्यांची जाणीव करुन देण्यात आली आहे. प्रत्येक पुरुषाचे हे कर्तव्य आहे की त्याने त्याच्या पत्नीचा व मुलांचा सांभाळ करावा. प्रस्तुतचे कलम २३ अन्वये न्यायालयास अंतरिम पोटगी देण्यासंबधी स्वेछाधिकार प्राप्त आहे. सदर स्वेच्छाधिकार हा निपक्षपातीपणे तसेच वैवाहिक कायद्याच्या तत्वाचे मार्गदर्शन करणारा आणि कायद्याच्या चौकटीमध्ये व कायद्याच्या उद्दिष्टांना अनुसरुन करण्यात यावा हे सर्वश्रुत आहे.

५. अर्जदार आणि गैरअर्जदार क्र.१ ते ६ यांच्या मधील नातेसंबंधाबाबत गैरअर्जदार यांनी उजर घेतलेला नाही. त्यामुळे, सदर कायद्यामध्ये नमुद असलेली कौटुंबिक संबंध ही बाब उभयपक्षांमध्ये असल्याचे दिसुन येते. यानंतर, सकृतदर्शनी कौटुंबिक हिंसाचार झाला किंवा नाही ही बाब पडताळुन पाहणे आवश्यक ठरते. अंतरिम पोटगीसाठी सकृतदर्शनी पुराव्याची आवश्यकता आहे. सकृतदर्शनी पुरावा व सबळ पुरावा हे दोन्हीही पुराव्याचे प्रकार एकमेकांपासुन वेगळे आहे. सबळ पुरावा हा उभयपक्षांनी दिलेल्या मौखिक व कागदोपत्री पुरावा व त्यावर घेण्यात आलेला उलट तपास यावरुन ठरविण्यात येतो. या उलट, सकृतदर्शनी पुराव्याचे स्वरुप हे संक्षिप्त आहे. अंतरिम पोटगीच्या अर्जावर निर्णय देतेवेळी उभयपक्षांमार्फत अर्जात नमुद करण्यात आलेली तथ्ये, लेखी जबाबातील तथ्ये आणि पटलावर दाखल केलेले दस्त याचाच विचार करावा लागतो. तसेच, सदर कायद्याच्या कोणत्याही कलमाखाली आदेश करित असताना सदर कायद्याचा हेतु व उद्दीष्टांकडे सुध्दा लक्ष द्यावे लागते. सदर कायद्याचा उद्देश हा पिडीत व्यक्तिच्या पतीला अथवा त्यांचे नातेवाईकांना शिक्षा देणे हा नक्कीच नाही. या व्यतिरिक्त अंतरिम पोटगी किंवा अर्जावर पिडितेच्या बाजुने आदेश झाला म्हणजे गैरअर्जदारांना प्रकरणात त्यांची बाजु मांडण्याचा अधिकार नाही असाही कायद्याचा स्थापित नियम नाही. अंतरिम आदेशाची तरतुद केवळ काही काळासाठी अर्जदारास चरितार्थ चालविण्यासाठी पैशाच्या स्वरुपातील मदत जलद रितीने व्हावी यासाठी करण्यात आलेली आहे.

६. अर्जदाराने असे म्हणणे मांडले आहे की, गैरअर्जदार हा दारुच्या नशेखाली अभद्र वर्तन करत होता, मारहाण करत होता व पैशाची मागणी करत होता असे कथन मुख्यत्वेकरुन केलेले आहे. त्यास उत्तर देत असताना गैरअर्जदाराचे असे म्हणणे आहे की, अर्जदारास गैरअर्जदाराचे घरी राहायची इच्छा नव्हती. तसेच तिचे कळंब येथील मुलासोबत प्रेमप्रकरण होते. त्यामुळे ती स्वतःहुन गैरअर्जदाराचे घर सोडुन गेलेली आहे. सदर अर्ज विचारात घेत असतांना प्रथमदर्शनी पुरावा बघणे आवश्यक आहे. ते दर्शविण्यासाठी अर्जदाराने दिनांक २९/०१/२०२४ रोजी पोलीस स्टेशन कळंब येथे दिलेल्या तक्रार अर्जाची प्रत दाखल केलेली आहे. त्या तक्रार अर्जामध्ये एकंदरीत या अर्जातीलच कथनांची पुनरावृत्ती केलेली आहे. गैरअर्जदाराच्या कथनाप्रमाणे अर्जदाराच्या घरच्यांनी तो घरी नसतांना गैरअर्जदाराचे आईस शिवीगाळ केली व मारहाण केली. परंतु ही बाब प्रथमदर्शनी सिध्द करण्यासाठी कोणतीही फिर्याद पटलावर दाखल केलेली नाही. गैरअर्जदाराने अर्जदाराच्या प्रेम प्रकरणाबाबत केलेला आरोप सिध्द करण्यासाठी संपरिक्षेची आवश्यकता आहे. सद्यस्थितीत गैरअर्जदाराचे कथनावरुन ही बाब सिध्द झाली असे म्हणता येणार नाही.

७. कौटूंबिक हिंसाचाराच्या प्रकरणांमध्ये उभयपक्षाचे वर्तन सुध्दा लक्षात घेणे आवश्यक आहे. त्यामुळे सदर प्रकरणामध्ये गैरअर्जदार क्र.०१ याने अर्जदारास नांदवण्यासाठी कोणते प्रयत्न केले, हे सुध्दा बघणे आवश्यक ठरते. गैरअर्जदाराच्या म्हणण्याप्रमाणे त्याने अर्जदार हिस नांदवण्यासाठी त्यांच्या कुटूंबियांच्या मदतीने प्रयत्न केले. परंतु अर्जदारास नांदवण्यासाठीचा कोणताही दावा दाखल केल्याची प्रत पटलावर दाखल केलेली नाही. केवळ अर्जदाराला सासरी करमत नाही, या कारणावरुन अर्जदार ही स्वतःहुन माहेरी राहील ही बाब सदसदविवेकबुध्दीला पटणारी नाही. अर्जदार ही गैरअर्जदार क्र.०१ याची विवाहीत पत्नी आहे ही बाब विवादीत नाही. त्यामुळे अर्जदाराच्या पालनपोषणाची जबाबदारी गैरअर्जदार क्र.०१ झुगारु शकत नाही. आरोपीला जेव्हापासुन तिचे माहेरी वास्तव्यास आहे. तेव्हापासुन गैरअर्जदाराने अर्जदारास आर्थीक मदत केलेली आहे असे पटलावरुन दिसुन येत नाही. त्यामुळे सदर बाब ही आर्थिक छळाच्या व्याख्येमध्ये मोडणारी आहे. निश्चीतच सदर बाब अधिनियमाच्या कौटुंबिक छळ या व्याख्येमध्ये बसते.

८. गैरअर्जदार क्र.१ हा सेंट्रींगचा व्यवसाय करत असुन त्यापासुन दरमहा रुपये २५ ते ३० हजार उत्पन्न मिळते. तसेच वडीलांची तीन एकर शेतजमिन वहिती करुन त्यापासुन ३ लाख वार्षिक उत्पन्न असे म्हणणे अर्जदाराने मांडले आहे. परंतु, गैरअर्जदाराचे शेतीबाबत व इतर

उत्पन्नाच्या बाबतीतील कोणताही प्रथमदर्शनी पुरावा अर्जदाराने पटलावर दाखल केलेला नाही. परंतु, सदर एकच बाब अंतरिम पोटगी नाकरण्यासाठी पुरेशी असु शकत नाही. उत्पन्नाच्या बाबतीतील प्राथमिक पुरावा नसल्यावर गैरअर्जदाराचे उत्पन्नाबाबतचा निकष लावावा लागेल. किमान वेतन कायद्याच्या तरतुदीप्रमाणे मजुरी करणाऱ्या व्यक्तीला सुध्दा दिवसाला रुपये २००/– ते २५०/– एवढे वेतन देण्याची तरतुद केलेली आहे. गैरअर्जदार क्र. १ मजुरीचे काम करतो असे गृहित जरी धरले तरी त्याचे महिन्याचे उत्पन्न रुपये ६,०००/– ते ७,०००/– घरात जाते. या व्यतिरिक्त सदर अधिनियमाच्या कलम २६(३) मध्ये अर्जदाराला म्हणजे पिडित व्यक्तिला दुसऱ्या कोणत्या सुनावणीदरम्यान आर्थिक सहाय्याचा आदेश तिला असेल तर तो सदर अधिनियमाखाली अर्जामध्ये नमुद करणे बाध्य असल्याचे सांगितले आहे. सदर अर्जदाराने फौजदारी प्रक्रिया संहिता कलम १२५ नुसार किरकोळ फौजदारी अर्ज क्र.३/२०२४ यामध्ये अर्जदार हिस रुपये २,०००/– प्रतिमाह अंतरिम पोटगी देण्यात यावा असा आदेश याच न्यायालयाने केलेला आहे. त्यामुळे सदर पोटगी लक्षात घेता, अर्जदारास या प्रकरणामध्ये दरमहा रुपये १,०००/– (रुपये एक हजार) पुरेसे वाटतात. सबब, पुढील आदेश पारित करण्यात येतो.

## <u>आदेश</u>

१. अर्ज अंशतः मंजुर करण्यात येतो.

२. अर्जदाराची अंतरिम पोटगीची मागणी अंशतः मंजुर करण्यात येत आहे.

३. गैरअर्जदार क्र.१ संतोष नारायण भिसे यांना असे निर्देशित करण्यात येते की, त्यांनी अर्जदारास अंतरिम पोटगी रक्कम रुपये १,०००/– (रुपये एक हजार) प्रतिमहा ही प्रस्तुत अर्जात दाखल दिनांक १५/०२/२०२४ पासुन मुळ अर्जाचा निकाल लागेपर्यंत द्यावी.

४. सदर आदेशाची प्रत दोन्ही पक्षास विनाशुल्क देण्यात यावी.

सही/–
(हर्षल ना. पोले)
न्यायदंडाधिकारी प्रथम श्रेणी,
कळंब, जि.यवतमाळ

कळंब
दिनांक १८/०४/२०२६